RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(२०)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **०४ जुलै २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LII OF 2025**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MATHADI, HAMAL AND OTHER MANUAL WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1969.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२.**

**महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीव कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३० याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** (१) महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ याच्या अनुसूचीमधील नोंद क्रमांक १४ नंतर पुढील नोंदी समाविष्ट करण्यात येतील:—

"१५. विटा तयार करण्याची व विटांच्या भट्टीत विटा तयार करण्याची नोकरी."

१६. कोळसा तयार करण्याची नोकरी.

१७. ट्रॉलरवर मासेमारी करण्याची नोकरी."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यामध्ये कोळसा तयार करणे, विटा तयार करणे किंवा विटांच्या भट्टीमध्ये विटा तयार करणे आणि त्याचप्रमाणे खाजगी व्यक्तींच्या मालकीच्या ट्रॉलर्समधून मासेमारी करणे यांसारख्या उद्योगांत खूप मोठा कर्मचारीवर्ग आहे. या कर्मचाऱ्यांकडून सममुल्याने श्रमाचे काम करुन घेतले जाते. तरीही त्यांनी केलेल्या श्रमाच्या तूलनेत त्यांना समतुल्याने पैसा दिला जात नाही.

म्हणून, या कर्मचाऱ्यांची, कामासंबंधी परिस्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या सेवांना संरक्षण मिळवून देण्यासाठी आणि सध्याच्या अनुचित परिस्थितीतून त्यांना मुक्त करण्यासाठी या श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे विनियमन करणे त्यांच्या कल्याणासाठी त्यांच्या नोकरीच्या अटी व शर्ती यासाठी अधिक चांगल्या तरतुदी करणे इष्ट आहे. विटा तयार करणे, कोळसा तयार करणे आणि मासेमारी उद्योग यांमध्ये नोकरी करणाऱ्या सर्व असंरक्षित कामगारांना महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ याच्या कक्षेमध्ये आणण्यासाठी त्या अधिनियमात सुधारणा करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २७ मे २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.